# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ७७८३ /२०१८ पुणे शहर, दिनांक २५/०८/२०१८

**विषय :- पुणे शहर पोलीस दल व पुणे महानगरपालिका समन्वय बैठक झाले बाबत.**

---

शनिवार दिनांक- २५/०८/२०१८ रोजी, सकाळी ११.३० ते १४.३० वाजे दरम्यान पोलीस आयुक्त, कार्यालय कॉन्फरन्स हॉल या ठिकाणी मा. श्री. के. व्यंकटेशम् , पोलीस आयुक्त, पुणे शहर व मा. श्री. सौरभ राव, महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे मार्गदर्शनाखाली पुणे पोलीस दल व पुणे महानगरपालिका अधिकारी यांची पुणे शहरातील वाहतुकीचे समस्या सोडविण्याबाबत समन्वय बैठक झाली. सदर बैठकीत सध्या चाललेली विकासकामे व वाहतुक सुरळीत होण्या सबंधाने काय उपयायोजना करता येतील या बाबत सविस्तर चर्चा झाली त्यामध्ये महत्वाचे सिग्नल सिंक्रोनायझेशन ,रस्त्यावर पडलेले खड्डे, वाहतुकीस अडथळा होणारे बॉटल नेक्स, रस्त्यावर झालेले वाहतुकीस अडथळा होणारे अतिक्रमण, अवैध पार्कींगवर कारवाई व इतर विविध विषयांवर चर्चा होऊन समन्वयाने सर्व कामे लवकरात लवकर करण्याचे महानगरपालिकाकडून व वाहतुक पोलीस विभागाकडून करण्याचे ठरले आहे.

सदर बैठकीस, अतिरिक्त पोलीस आयुक्त, श्री.सेनगावकर, अतिरिक्त महापालिका आयुक्त, शितल उगले,संचालक पीएमपीएमएल नयना गुंडे, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक, तेजस्वी सातपुते, तसेच वाहतुक शाखेचे अधिकारी व पुणे महानगरपालिकाचे सर्व विभागप्रमुख, सर्व वॉर्ड अधिकारी हजर होते.

अशा प्रकारच्या समन्वय बैठका यापुढेही नियमीत होणार आहेत.त्यामुळे कामास गती येणार आहे.